# ASER 2023 सर्वेक्षण - अनुभव mode on!



त्या सकाळी आम्ही गावात प्रवेश केला तेव्हा दुरून बघता आमचे लक्ष ओढले ते म्हणजे घनदाट हिरवे गार परिसर, जसजसे आम्ही जवळ आलो तसे आमचा लक्ष वेधून घेणार हा" खो खो" - खेळात खेळणाऱ्या  उत्साही मुली दिसल्या. पुढे काही अंतरावर  घरातून डोकावून बघणाऱ्या महिला आणि आमच्या भेटीचा उद्देश शोधण्यासाठी उत्सुक असलेले गावातले गावकरी तिथले लोक जणू काही आम्हाला एक ऊर्जाच देत होत सर्वेक्षण सर्वरीत्या पूर्ण करण्यासाठी. येणाऱ्या नवीन गमतीदार गोष्टी आणि धमाल यांच्या विचाराणीचं आमच्या उत्साह वाढला.

आम्ही पुढे सरपंचांचा घर कडे पत्र देण्या करता निघालो. नंतर गावाचा फेरफटका घेत घेत आम्ही सुरवातीला गावाचा नकाशा काढायला सुरु केला,आणि आम्ही गावातल्या आजोळ व्यक्ती सोबत तो नकाशा पडताळून घेतला. आमच्या सोबती अवती भवती लहानाची मज्जा चालू होती कारण त्यांचा लक्ष वेधून घेणाऱ्या गोष्टी जस लॉग बुक, सर्वे नमुने,सर्वे पुस्तिका हे सर्व सोबत होते. आम्ही दोघे-तिघे जण आणि ती लहान मुले निघालो सर्वेक्षण करायला सुरु केला.



सर्वेक्षण केलेल्या घरामध्ये आम्हाला, एका आईची उसुकता - तिच्या मुलाची डिजिटल कौशल्ये आणि शैक्षणिक पातळी जाणून घेण्यासाठी तिची समज स्पष्टपणे दिसून आली कारण तिने शहरातून आपल्या मुलासाठी गावात आल्याबद्दल आभार मानले. तिने मुलाला शिक्षणाचे महत्त्व सांगितले. पुढे आणखी एका घरात, आम्ही चौदा ते अठरा वयोगटातील विवाहित महिलेचा सर्वेक्षण सुरू केले. या संपूर्ण प्रक्रियेत तिच्या कुटुंबीयांनी तिला साथ दिली. तिचा घरातले तिला आत्मविश्वासाने बोलायला आणि नमुने सोडवायला प्रोत्साहन देत होते.

असर चा ट्रैनिंग ने आम्हाला स्पष्टरित्या नियम सांगितलं होत कि सर्वेक्षण घराच्या डावीकडून पाचव्या घर चा सर्वे करण्यासाठी घराची निवड करायची, परंतु आम्हाला गावातले लोक आणि विशेत्या महिला विनंती करत होते कि आम्ही त्यांच्या शेजारच्या घरीही जावे.

नांदेडन सर्वेक्षणादरम्यानच्या अनुभवामुळे माझा गावाकडे बघायचा दृष्टिकोन आणि तरुणांच्या आकांक्षांबद्दलची जाणीव वाढली आहे. असर टीम सोबत सहकार्य केल्याने आणि त्यांच्या केंद्रित प्रशिक्षणामुळे, परिणाम साध्य करण्यासाठी लक्ष केंद्रित करण्याची माझी क्षमता वाढली आहे.

**Author: Pranita Katkar, Pratham.**